ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 47026

# IDEAL

Single Blind Review/Double Blind Review

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani



Volume - XII, Issue - II
March - August - 2024
Marathi Part - V

Impact Factor / Indexing
2023 - 7.537
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta. Sonpeth Dist. Parbhani

ISSN 2319 - 359X

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - XII Issue - II March - August - 2024

MARATHI PART - V

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 47026

Single Blind Review/Double Blind Review

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 7.537
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

VOLUME - XII, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2024
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 7.537 (www.sjifactor.com) AP-6

# CONTENTS OF MARATHI PART - V



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय निर्वाचन आयोग आणि निवडणूक विषयक सुधारणा<br>**प्रा. डॉ. गोलेकर के. एम.** | १-७ |
| २ | पाकिस्तान निवडणूक २०२४ राजकीय विश्लेषण<br>**प्रा. डॉ. बापुराव आंधळे** | ८-१३ |
| ३ | भारतातील सुशासन आणि नवीन शैक्षणिक धोरण<br>**शाम गंगाधर आवटे** | १४-१६ |
| ४ | नवीन शैक्षणिक धोरण संधी आणि आव्हाने<br>**डॉ. रामदास धोंडबाराव मुक्टे** | १७-२२ |
| ५ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून साध्य करावयाची एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्य<br>**डॉ. सोमनाथ श्रीरंग राऊत** | २३-२७ |
| ६ | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात प्रतिबिंबित होणारे शालेय शिक्षण<br>**डॉ. एल. पी. हिंडोळे** | २८-३३ |
| ७ | प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा<br>**प्रा. सबाना हमीद तडवी** | ३४-३८ |
| ८ | NEP 2020 आणि विद्यार्थी कल्याण धोरण<br>**कु. भाग्यशाली अर्जुन घोंगडे**<br>**प्रा. डॉ. टी. आर. फिसफिसे** | ३९-४४ |
| ९ | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: स्वरूप, संधी आणि आव्हाने<br>**प्रा. बंडू पाटेकर** | ४५-५० |
| १० | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे ग्रामीण विकासातील महत्त्व<br>**चंद्रकांत निरंजन पुरी**<br>**प्रा. डॉ. संजय गायकवाड** | ५१-५५ |
| ११ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०आणि ग्रामीण विकास<br>**प्रा. डॉ. राठोड ईश्वर लक्ष्मण** | ५६-६० |
| १२ | ई- गव्हर्नन्स<br>**प्रा. आनंद वैजनाथ साबणे** | ६१-६३ |
| १३ | मराठवाड्यातील चालुक्यकालिन मंदिरस्थापत्य कला<br>**प्रा. डॉ. महेंद्र घनसावंत** | ६४-६७ |

# १. भारतीय निर्वाचन आयोग आणि निवडणूक विषयक सुधारणा

**प्रा. डॉ. गोलेकर के. एम.**
राज्यशास्त्र विभागप्रमुख, कै. रमेश वरपूडकर (ACS) कॉलेज सोनपेठ, जि.- परभणी.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना**

भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. आपण इंग्लंड या देशाचे अनुकरण केले असले तरी त्यामध्ये अनेक अमुलाग्र बदल करून या संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधान निर्माण होण्याची प्रक्रिया 9 डिसेंबर 1946 पासून सुरू झाली आणि ती 26 नोव्हेंबर 1949 रोजी संपली. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान स्वीकारण्यात आले असले तरी त्याची अंमलबजावणी मात्र 26 जानेवारी 1950 पासून सुरू झाली. भारताने लोकशाहीचा स्वीकार केल्यामुळे राजकीय पक्षांची निर्मिती होणे अपेक्षितच होते. त्यानुसार भारतात अनेक राजकीय पक्षांची निर्मिती झाली. पक्ष म्हटले की निवडणुका आल्या या निवडणुका घेण्याची जबाबदारी घटनेतच एक स्वतंत्र निवडणूक आयोग निर्माण करून त्याच्यावर सोपवण्यात आली. अशा या निवडणूक आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1950 रोजी करण्यात आली. म्हणून 25 जानेवारी हा मतदार दिन म्हणून ओळखला जातो. भारतीय संविधानात दहा स्वतंत्र आयोगांची निर्मिती सुरुवातीलाच करण्यात आलेली होती. त्यापैकी निर्वाचन आयोग हा एक आहे. भारतीय राज्यघटनेच्या भाग 15 मध्ये कलम 324 ते 329 या कलमांमध्ये निर्वाचन आयोगासंबंधीच्या सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या निर्वाचन आयोगावर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषद अशा एकूण सहा प्रकारच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भारतीय निर्वाचन आयोग सन 1950 ते 1989 एक सदस्य आयोग होता. मात्र 1989 मध्ये इतर दोन आयुक्तांची नेमणूक करण्यात आली आणि एक ऑक्टोबर 1993 पासून या दोन आयुक्तांची नियमित नेमणूक करण्यात येऊ लागली त्यामुळे आयोग बहुसदस्यीय बनला. भारतीय निर्वाचन आयोगाचे पहिले आयुक्त म्हणून कुमार सेन यांनी 21 मार्च 1950 ते 19 डिसेंबर 1958 या कालावधीत काम पाहिले. सन 1989 पर्यंत भारतीय निर्वाचन आयोग तसा फारसा चर्चेत नव्हता परंतु जेव्हा टी.एन. शेषन यांची निवडणूक आयुक्त म्हणून नेमणूक झाली (12 डिसेंबर 1990) तेव्हापासून हा आयोग चर्चेचा विषय बनला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे टी एन शेषन यांचे व्यक्तिमत्व. कारण पूर्वी निर्वाचन आयोग एक साईड ब्रँच असल्याप्रमाणे कार्य करीत होता. त्याच्याकडे कोणाचेही फारसे लक्ष नव्हते. टी .एन. शेषन पूर्वी या आयोगाची अवस्था सरकार सांगे आणि निर्वाचन आयोग ऐके अशी होती. परंतु ते पदावर येताच निर्वाचन आयोग सांगे आणि सरकार ऐके अशी परिस्थिती निर्माण केली. परंतु ही परिस्थिती सरकारने फार काळ टिकू दिली नाही. ज्या वेगाने टी एन सेशन निवडणूक विषयक सुधारणा करत होते ते सरकारला अडचणीचे वाटले. अनेक वर्ष एक सदस्यीय असणारा आयोग सरकारने त्यांचे अधिकार कमी करण्यासाठी तो बहुसदस्यीय बनवला. तेव्हापासून काही प्रमाणात निवडणूक आयोगाच्या सुधारणांच्या वेगाला खीळ बसली असली तरी त्यांनी या आयोगावर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

येऊन ज्या सुधारणा सुरू केल्या त्या सुधारणांचा वेग अद्यापही कमी झालेला नाही. भारतीय संविधानात अशा अनेक घटनात्मक संस्था आहेत. परंतु या सर्व संस्थांमध्ये निर्वाचन आयोग एकमेव अशी संस्था आहे की, जिच्या सुधारणांचा वेग हा इतर घटनात्मक संस्थांपेक्षा अधिक आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांची नेमणूक राष्ट्रपती द्वारे केली जाते. इतर दोन निवडणूक आयुक्त देखील राष्ट्रपती द्वारेच नेमले जातात. निवडणूक आयुक्तांचा कालावधी सहा वर्षासाठी असतो किंवा वयाच्या 65 वर्षापर्यंत ते आपल्या पदावर राहू शकतात. या दोन्हीपैकी एक जे अगोदर संपेल ते गृहीत धरले जाते. निवडणूक आयुक्तांना अकार्यक्षमता, गैरवर्तन या कारणावरून बडतर्फ करता येते. अशी बडतर्फी राष्ट्रपती द्वारे केली जाते. बडतर्फीचा ठराव संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दोन तृतीयांश बहुमताने संमत होणे आवश्यक असते. इतर सह आयुक्तांना बडतर्फ करण्यासाठी मुख्य निर्वाचन आयुक्ताने राष्ट्रपतींना शिफारस करावी लागते. त्यांच्या शिफारशीवरून राष्ट्रपती दोन्ही आयुक्तांना बडतर्फ करू शकतात. निवडणूक आयुक्तांना वेतन व भत्ते आणि इतर सुख सुविधा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाप्रमाणे मिळतात. निर्वाचन आयोगास स्वतंत्र नोकरवर्ग नेमता येत नाही. निवडणुका घेण्यासाठी लागणारा नोकरवर्ग राज्यांनी पुरवावयाचा असतो. आयोगाने विनंती केल्यास राष्ट्रपती व राज्यपाल त्यांना आवश्यक असेल तेवढा नोकरवर्ग उपलब्ध करून देतात. निवडणूक काळात हा नोकरवर्ग शासनास जबाबदार नसतो तो निर्वाचन आयोगाला जबाबदार राहून काम करत असतो. निवडणुका संपताच पुन्हा तो आपल्या पूर्ववत नोकरीत रुजू होतो.

भारतात निवडणूक विषयक सुधारणा या त्याच्या स्थापनेपासूनच सुरू झालेले आहेत. हा सुधारणांचा वेग मात्र कमी अधिक असू शकतो. भारतीय संसदेने निवडणुकीचे तत्व प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी अनेक कायदे पास केले. त्यात लोकप्रतिनिधीत्व कायदा 1950, लोकप्रतिनिधित्व कायदा 1951, परिसिमन आयोग कायदा 1952, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती निर्वाचन कायदा 1952, मतदार नोंदणी कायदा 1960, समांतर सदस्यत्व प्रतिबंध कायदा 1950, परिसिमन आयोग कायदा 1952, 1962, 1972, 2005. उमेदवार नोंदणी नियम 1960, निवडणूक संहिता नियम 1964, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन कायदा 1963, निवडणूक आयोग आदेश आरक्षण विभागणी 1968, मतदार निर्धारण मंडळ कायदा 1972, दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्य क्षेत्र प्रशासन कायदा 1991, मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्त सेवा शर्ती कायदा असे अनेक महत्त्वपूर्ण कायदे करून वेगवेगळे आदेश व निर्देश निर्वाचन पद्धती निपक्षपाती राहण्यासाठी काढले आहेत.

यशवंतराव चव्हाण समिती...भारतीय निर्वाचन आयोगा समोर साधारण 1967 पर्यंत फारशी आव्हाने नव्हती. मात्र नंतरचा कालावधी राजकीय पक्षांच्या दृष्टीने हानिकारक मानला जातो. कारण राजकीय पक्षात पक्षांतर करण्याची सुनामी आली आणि अवघ्या एका वर्षात 438 एवढ्या पक्षांतराच्या घटना घडल्या. प्रत्येक पक्षात आयाराम गयाराम ही प्रवृत्ती वाढीस लागली. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी 1968 मध्ये तत्कालीन गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र सरकारने एक समिती नेमली. या समितीने पक्षांतरा विषयी, निवडणूक प्रक्रिये संबंधी शिफारशी केल्या. खऱ्या अर्थाने निवडणूक विषयक समस्यांना आणि सुधारणांना इथूनच सुरुवात झाली. या समितीने अनेक शिफारशी केल्या परंतु अंमलबजावणी गांभीर्याने होऊ शकली नाही. या समितीने

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

मंत्रिमंडळाची सदस्य संख्या निश्चित असावी अशी एक महत्वपूर्ण शिफारस केली होती. त्याला अनुसरूनच आता भारतीय घटनेत दुरुस्ती होऊन मंत्रिमंडळाचा आकार एकूण सदस्य संख्येच्या पंधरा टक्के करण्यात आला आहे.

तारकुंडे समिती...निवृत्त न्यायाधीश व्ही एम तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली हि समिती नेमली होती. जनसत्ता व सत्ताधारी पक्षाकडून सरकारी साधनांचा प्रशासकीय व्यवस्थेचा होणारा दुरुपयोग थांबवणे, निवडणुकीसंबंधी दाखल झालेल्या खटल्यांना होणारा विलंब शोधण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. या समितीने अनेक शिफारशी केल्या उदा: मतदाराचे वय 18 करण्यात यावे. पुढे या निवडणूक विषयी सुधारणेचा विचार करून 61 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. तसेच घटक राज्यांमधून निवडणूक आयोग स्थापन करावेत अशीही एक शिफारस करण्यात आली होती.

दिनेश गोस्वामी समिती...सन 1990 मध्ये दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मोर्चा सरकारने ही एक समिती नेमली होती. या समितीने अनेक शिफारशी केल्या उदा. मतदारांना बहुउद्देशीय ओळखपत्र असावे, भविष्यात निवडणुकीसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करावा. आदर्श आचारसंहितेचे पालन करावे.

संथानम समिती...निवडणुकीतील भ्रष्टाचार, बेहिशेबी खर्च यासंबंधी ही समिती नेमण्यात आली होती. या समितीने निवडणुकातील खर्च सरकारनेच करावा अशी शिफारस केली. तसेच निवडणूक आयोगाने पक्षाचे उत्पन्न आणि खर्च तपासावा, निवडणुकीत उमेदवाराने केलेला खर्च एका निश्चित वेळेत आयोगाला सादर करावा. अशा शिफारसी केल्या.

निवडणूक सुधारना विषयक सरकारने केलेले कायदे ...निवडणूक विषयक सुधारणासाठी सरकारने काही कायदे केले होते. त्यापैकी सर्वात महत्त्वाचा कायदा म्हणजे 1885 चा पक्षांतर बंदी कायदा.

यामध्ये पक्षाचा आदेश न मानणाऱ्यां प्रतिनिधींना अपात्र ठरवणे, निवडणुकीनंतर पक्षांतर केल्यास सदस्यत्व रद्द करणे, पक्षातील एक तृतीयांश सदस्यांनी पक्षांतर केले तर ते पक्षांतर नसून वैचारिक फूट असेल, पक्ष शिस्तीच्या कारणावरून काढलेल्या सदस्यास हा कायदा लागू नसेल, पक्षांतरासंबंधी न्यायालयात दाद मागता येईल.

73 व 74 वी घटना दुरुस्ती...सन 1992 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण आणि शहरी यांच्या संदर्भात 73 व 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यामध्ये या संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला आणि त्यांच्या निवडणुकांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपवण्यात आली. त्यानुसार भारतातील प्रत्येक घटक राज्यांनी स्वतंत्र कायदा करून आपापल्या राज्यांमध्ये राज्य निवडणूक आयोगाची स्थापना केली आहे. त्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका पार पाडल्या जातात.

न्यायालयीन निर्णय...निवडणूक विषयक अनेक वादविवाद घडून आलेले आहेत हे वाद विवाद न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयांनी या संदर्भात काही निकाल दिलेले आहेत हे सर्व निकाल निवडणूक सुधारणांचे एक भाग बनलेले आहेत. उदा: उमेदवारांनी आपल्या मालमत्तेसंबंधीची माहिती दोन स्थानिक वर्तमानपत्रातून मतदारांना द्यावी असा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने 1998 मध्ये दिला. प्रत्येक उमेदवाराने आपली कौटुंबिक माहिती, शैक्षणिक माहिती, संपत्ती, गुन्हेगारी संबंधीच्या बाबी या निवडणूक अर्जासोबत एका प्रतिज्ञापत्राद्वारे देण्याचा आदेश 2003 मध्ये दिला. पक्षांतराच्या कारणावरून अपात्र उमेदवारासंबंधी केवळ

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 AP - 6

उमेदवारांनाच हरकत घेण्याचा अधिकार होता तो न्यायालयाने 2013 मध्ये रद्द ठरवून हरकत घेण्याचा अधिकार सर्व भारतीय नागरिकांना दिला.

भारतीय निर्वाचन आयोगाने केलेल्या सुधारणा...भारतीय निर्वाचन आयोगास न्यायिक अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्याने आपल्या अधिकाराचा वापर करत अनेक निवडणूक विषयक सूचना, सुधारणा केलेल्या आहेत. अद्यावत मतदार यादी, मतदारांसाठी ओळखपत्र, मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक यंत्राचा वापर, आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, उमेदवारी अर्ज सोबत स्वतंत्र शपथ पत्र भरणे बंधनकारक, आचारसंहितेचे पालन व्यवस्थित होते की नाही हे पाहण्यासाठी निरीक्षक गट नेमणे इ.

व्ही व्ही पॅट चा वापर...ईव्हीएम मशीन द्वारे केलेले मतदान कोणाला जाते हे समजण्यासाठी य व्हीव्हीपॅट नावाचे यंत्र ईव्हीएम मशीनला जोडण्यात आले. त्यामुळे मतदाराने ज्या पक्षाला चिन्ह दाबून मतदान केले आहे त्या पक्षाचे चिन्ह या व्हीव्हीपॅट मशीन द्वारे मतदारांना दिसून येते. त्यामुळे आपण ज्या पक्षाला मतदान केले आहे त्याच पक्षाला आपले मतदान झाले की नाही हे समजून येते.

आर व्ही एम मशीन चा वापर...भारतात स्थलांतरित मतदारांची संख्या 37% एवढी आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आणि स्थलांतरित लोकांना मतदान करता यावे यासाठी आरव्हीएम रिमोट वोटिंग मशीनचा वापर करण्याची योजना निर्वाचन आयोगाची होती. यासंबंधीचा डेमो 16 जानेवारी 2023 ला आयोजित करण्यात आला होता. परंतु यावर सर्व विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकल्यामुळे ही योजना अमलात येऊ शकलेली नाही. या मशीनद्वारे 72 मतदार केंद्र एकाच मशीनला जोडण्यात येणार होते. जे लोक विविध कारणांसाठी बाहेर आहेत, एका दिवसात येऊन मतदान करणे शक्य नाही त्यांच्यासाठी ही योजना तयार करण्यात आली होती.

राजकीय आचारसंहितेची अंमलबजावणी...निवडणूक काळात राजकीय पक्षांनी,संस्थांनी तसेच नागरिकांनी निवडणूक विषयक आचारसंहितेचे पालन करावयाचे असते ही आचारसंहिता निवडणूक घोषणा झाल्याबरोबरच सुरू होते आणि निकाल जाहीर होताच संपते. जातीचा, भाषिक गटांमध्ये द्वेष निर्माण करणे, भडक भाषणे देणे, सत्ताधारी पक्षाने सरकारी यंत्रणेचा वापर न करणे, निवडणूक जाहीर झाल्यानंतर अनुदानांची घोषणा न करणे, योजना जाहीर न करणे तसेच निवडणूक कार्यात सरकारी कर्मचाऱ्यांनी पक्षपाती धोरण न ठेवणे. या बाबीचा समावेश आहे.

अनामत रकमेत वाढ...निवडणुकीत आयोगाने उमेदवारांसाठी एक अनामत रक्कम निश्चित केलेली आहे. ती निवडणूक अर्ज भरताना रिझर्व बँकेत भरावी लागते. 2009 च्या लोकप्रतिनिधी सुधारणा कायद्यानुसार लोकसभेसाठी उमेदवाराला 25 हजार रुपये भरावे लागतात. विधानसभेच्या निवडणुकीसाठी 10 हजार रुपये मर्यादा करण्यात आली आहे. यापूर्वी अनामत फारच कमी असल्यामुळे सर्वसामान्य कोणीही निवडणुकीच्या उमेदवारीसाठी आपला अर्ज दाखल करत असे.

निवडणूक खर्च दाखल करणे...निर्वाचन आयोगाच्या आचारसंहितेचाच एक भाग म्हणून निवडणुकीस उभे राहिलेल्या किंवा उभे राहून अर्ज परत घेतलेल्या उमेदवाराने निवडणूक विषयक खर्चाचा हिशोब निवडणूक आयोगाला 45 दिवसांच्या आत सादर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq. Sonpeth Dist. Parbhani

करावयाचा असतो. त्याने अपेक्षित खर्चा पेक्षा जास्त रक्कम खर्च केली तर आयोग त्याच्यावर योग्य ती कारवाई करून त्या उमेदवाराला निवडणुकीसाठी अपात्र घोषित करू शकते किंवा त्याची निवडणूक रद्द करू शकते.

अद्यावत मतदार यादी...अद्यावत मतदार यादी तयार करण्याचे प्रमुख काम टी एन शेषन यांनी केले. कारण त्यांना माहित होते आयोग परंपरागत मतदार यादी वापरून मतदानाची प्रक्रिया पार पाडत आहे. त्यामुळे अनेक मृत पावलेल्या व्यक्तींची नावे मतदार यादी मध्ये होती. त्यांच्या नावावर अनोळखी व्यक्ती मतदान करून जात असत. हे थांबवण्यासाठी त्यांनी अद्यावत मतदार याद्या तयार केल्या. एक मोठे आव्हान आहे. कारण भारतात जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा मतदारांची संख्या खूप मोठ्या प्रमाणामध्ये आहे. त्यामुळे सर्वांची नावे मतदार यादी मध्ये समाविष्ट करणे मोठे आव्हान आहे. घटनेतील 325 व्या कलमानुसार कोणत्याही भारतीय व्यक्तीला धर्म, वंश, जात, लिंग या कारणावरून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यास अपात्र ठरविले जात नाही. अद्यावत निवडणूक याद्या तयार करणे हे निर्वाचन आयोगाचे काम असले तरी प्रत्यक्षात राज्यातील अधिकारी मतदार याद्या तयार करतात. त्यामुळे अनेक वेळा पक्षपातीपणा केल्याचे आढळून येते. याबाबत अनेक राज्यातून मतदार याद्या संदर्भात निर्वाचन आयोगाला तक्रारी प्राप्त होतात. काही वेळा एकाच व्यक्तीचे नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी  असतात. अलीकडेच मतदार यादी मधील हा गोंधळ दूर करण्यासाठी निर्वाचन आयोगाने सॉफ्टवेअरचा वापर करत गरुडा नावाचे ॲप तयार केले आहे. हे ॲप एकच मतदार दोन किंवा त्यापेक्षा जास्त ठिकाणी सारखा फोटो असलेले मतदार शोधण्याचे काम करतो आणि त्याद्वारे कुठल्याही एका ठिकाणी मतदाराचे नाव ठेवून दुसऱ्या ठिकाणचे नाव डिलीट करण्याचे काम करतो.

नोटाचा वापर...सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार निवडणूक आयोगाने मतपत्रिका किंवा इलेक्ट्रिक मतदार यंत्रावर वरीलपैकी कोणताही नाही हा नोटा पर्याय ठेवण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे मतदारसंघात उभे असलेल्या कोणत्याही उमेदवाराला मत देऊ नये असा निर्णय झाला तर त्या कोणत्याही उमेदवाराला मत न देण्याचा अधिकार नागरिकांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे नागरिक आपल्याला उमेदवार पसंत नसेल तर  नोटाचे बटन दाबून आपले मत नोंदवू शकतात.

ऑनलाइन मतदार नोंदणी... 24 ऑक्टोबर 2013 च्या केंद्र सरकार मतदार नोंदणी दुरुस्ती नियमानुसार, मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करता येईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे. यासाठी निवडणूक आयोगाद्वारे एका स्वतंत्र व्होटर हेल्पलाइन ह्या ॲपचा निर्मिती करण्यात आली आहे. याद्वारे मतदार आपले नाव मतदार यादी मध्ये समाविष्ट करू शकतात.

अनिवासी भारतीयांना मतदानाचा अधिकार...2010 मध्ये लोकप्रतिनिधी सुधारणा कायद्यानुसार विदेशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार देण्यात आलेला आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला ज्याचे नाव मतदार यादीत नाही , ज्याचे नागरिकत्व दुसऱ्या देशाचे असेल, जो नोकरी किंवा शिक्षणानिमित्त किंवा इतर कारणासाठी भारतात नेहमीसाठी वास्तव्यास नसेल अशा नागरिकाला वास्तव्याच्या ठिकाणी लोकसभा व विधानसभा मतदारसंघात आपले नाव नोंदविण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे..

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



टपाली मतदान...सन 1999 च्या जनप्रतिनिधी कायद्यानुसार भारतीय नागरिकांना टपालाद्वारे मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. काही महत्त्वपूर्ण कारणामुळे किंवा शासकीय सेवेत असल्यामुळे मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदान करणे शक्य होत नसेल अशा मतदारांना मतदान करता यावे याकरिता टपाली मतदानाची सुविधा देण्यात आली आहे. आपले मत नोंदविण्यासाठी मतदान तारखेच्या पूर्वी अशी परवानगी टपाली अर्जाद्वारे घेतल्यास दूरवर असणाऱ्या मतदाराला त्याच्या पत्त्यावर टपालाद्वारे मतपत्रिका पोहोचवली जाते व त्याचे मतदान संबंधित मतदार संघातील निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठविले जाते. हे मतदान मतपत्रिकेद्वारे केले जाते.अशी मते मतमोजणी मध्ये सर्वप्रथम मोजली जातात.

मतदार फोटो ओळखपत्र EPIC... सन 1995 पासून निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त टी एन शेषन यांच्या पुढाकाराने मतदारांना फोटो ओळखपत्र देण्यात आली. त्यामुळे मतदान प्रक्रियेत बोगस मतदान करण्याच्या प्रवृत्तीला खूप मोठा आळा बसला. अनेक लोकांना ही ओळखपत्रे मिळाली नाही त्यामुळे निवडणूक ओळखपत्रा शिवाय इतर फोटो ओळखपत्रांचा वापर निवडणुकीमध्ये करण्यात येऊ लागला. यासाठी जवळजवळ 14 प्रकारचे फोटो ओळखपत्रांचा केला जातो. उदा: पासपोर्ट, पॅन कार्ड, कर्मचारी सेवा ओळखपत्र.

भारतीय निर्वाचन आयोगात गेल्या 70 वर्षापासून वेगवेगळ्या प्रकारची संशोधने होत आहेत. प्रत्येक निवडणुकीत कोणत्या ना कोणत्या समस्या उद्भवतात आणि त्या समस्यावर उपाय शोधण्यातून निवडणूक विषयक सुधारणा करण्यात येतात. त्यामुळे देशात निवडणूक विषयक सुधारणांचा उपक्रम सतत चालू आहे. देशाच्या कोणत्या ना कोणत्या भागात सतत निवडणुका असतात त्या निवडणुकीच्या माध्यमातून अशा सुधारणा होत असतात. निवडणूक आयोगा विषयीच्या कार्यपद्धतीबद्दल अनेक वाद निर्माण होत असताना आढळतात उदा: व्हीव्हीपॅट द्वारे होणारे मतदान मोजले जावे अशी प्रमुख मागणी राजकीय पक्षांची होत असताना त्याकडे निवडणूक आयोग दुर्लक्ष करत आहे. तसेच निवडणूक आयोगातील नेमणुका सुद्धा एक वादग्रस्त मुद्दा बनत चालला आहे कारण सरकार आपल्याला अनुकूल असणाऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक निवडणूक आयुक्त म्हणून करत आहे. अशा प्रकारचा आक्षेप विरोधी पक्षाकडून घेतला जात आहे. नेमणुकांच्या बाबतीमध्ये सरकार द्वारे पारदर्शकता ठेवली जात नसल्यामुळे निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीचा वाद सर्वोच्च न्यायालयात जाऊन पोहोचला आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयुक्तांच्या नेमणुका करण्यासाठी एक स्वतंत्र कायदा बनवावा त्या कायद्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशा बरोबरच पंतप्रधान आणि विरोधी पक्ष नेता यांचा समावेश असावा असा निकाल दिला होता परंतु सरकारने कायदा बनवत असताना या सूचनेचे पालन न करता या पॅनलमध्ये पंतप्रधान, विरोधी पक्ष नेता आणि सत्ताधारी पक्षातील एक मंत्री यांचा समावेश असणारा कायदा केला.

**शिफारसी**

- प्रत्येक सरकारने निवडणूक आयोगाचे स्वातंत्र्य जोपासावे.
- निवडणूक आयोगातील सदस्यांनी नेमणूक होताच स्वतंत्र आणि नि:पक्षपातीपणाने काम करावे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

- निवडणूक सुधारणा करतना राजकीय पक्षांची, सर्वसामान्य जनतेची मते विचारात घ्यावीत.
- निवडणुकीतील पारदर्शकता वाढविण्यासाठी जास्तीत जास्त एक ते तीन टप्प्यात संपूर्ण देशात मतदानाची प्रक्रिया पार पाडावी.
- सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकी प्रमाणे या आयुक्तांची नेमणूक व्हावी.
- स्वतंत्र निवडणूक कर्मचारी वर्ग निर्माण करण्यात यावा
- अर्थसंकल्पात निवडणूक खर्चा संबंधी तरतूद करण्यात यावी निवडणूक खर्चाचे ऑडिट व्हावे.
- लोकसभा आणि राज्यसभा उमेदवारांसाठी वयाची अट अनुक्रमे 21 व 25 करण्यात यावी.
- राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांचा निवडणूक खर्च सरकारद्वारे करण्यात यावा.
- व्ही व्ही पॅट मधील मतांची मोजणी करावी.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

**संदर्भ**

- भारताचे संविधान,महाराष्ट्र सरकार.
- भारतीय राज्यघटनेची ओळख, दुर्गादास बसू.
- इंडियन पॉलिटी,एम लक्ष्मीकांत.
- लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन, डॉ. प्रशांत विधे.
- भारतीय संसदेची कार्यपद्धती, लक्ष्मण बाबुराव शिंदे
- आपली संसद, सुभाष सी कश्यप.
- दै. लोकसत्ता